# गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

शिक्षणतज्ज्ञ जे. पी. नाईक यांनी, दादाभाई नौरोजी स्मारक पारितोषिका मानकरी या नात्याने, १९६३ साली, 'भारतातील प्राथमिक शिक्षण : एक अपुरे कार्य ' या शीर्षकाखाली तीन व्याख्याने दिली होती. श्री. जे. पी. नाईक यांच्या या जन्मशताब्दीच्या वर्षात, त्यांच्या या, प्राथमिक शिक्षणाचा साकलिक विचार करणा-या व्याख्यानांची आठवण मी जागी करु इच्छितो. या व्याख्यानांमध्ये जे. पी. नाईक यांनी प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा विषय समोर ठेवून, या संदर्भातील त्यापूर्वीच्या शतकभरातील घटनांचा आढावा घेऊन, याकरिता कोणते प्रभावी उपाय अंमलात आणता येतील, ते कोणत्या अग्रक्रमाने अंमलात आणावेत, यांविषयीची जशी चर्चा केली आहे तशीच ती भारतातील शिक्षणविषयक गरजांचा संख्यात्मक आढावा घेऊन, भारतातील पुढील काही काळांतील श्रमशक्ती नियोजन कसे असावे याची ही दिशा स्पष्ट केली आहे.

ज्या काळात ही व्याख्याने झाली तो काळ भारतातील तिस-या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीचा काळ होता. पंचवार्षिक योजनांविषयी एक उत्साहाची लहर वातावरणात होती. उद्योगप्रधान योजनेची दुसरी पंचवार्षिक योजना नुकतीच संपुष्टात येऊन तिस-या योजनेत भारताच्या औद्योगिकरणाच्या दिशेने अधिक वेगाने आगेकूच चालू ठेवली होती. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या पूर्वतयारीचा काळ दृष्टीक्षेपात होता. राज्यघटनेच्या ४५ व्या मार्गदर्शक तत्वानुसार १९६० सालापर्यंत मुलांना, वयाच्या १४ व्या वर्षांपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा मानस होता, नि तो पूर्णतेला मात्र गेला नव्हता. विशेष म्हणजे, " आपली मोठी शोकांन्तिका ही आहे की, हे उद्दीष्ट जर आपण निश्चित गाठणार असू, तर ते केव्हा, हे सांगणारा एकही सरकारी कार्यक्रम आपल्याजवळ नाही !" असे जे. पी. नाईक यांनीच त्यावेळी दाखवून दिले आहे. जे. पी. नाईक यांची उपयुक्त तीन व्याख्याने ही या पार्श्वभूमीवर दिलेली भाषणे होती.

जे. पी. नी आपल्या व्याख्यानांचे जे मुख्य सूत्र होते ते सुरवातीलाच मांडले होते. प्राथमिक शिक्षणाची प्रगती इतकी मंद का ? आणि शिक्षणविषयासंबंधी संविधानात असलेल्या या एकमेव राज्यधोरणविषयक आदेशाची अंमलबजावणी आपण का करु शकलो नाही ? हे दोन प्रश्न सोडविण्याची दिशा दाखवणे, हे ते सूत्र होते. खरे तर, आजही हेच दोन प्रश्न समोर उभे करुन आपण पुन्हा नव्याने चर्चा करण्याची गरज आहे.

आज आपण शिक्षणाच्या गुणवत्तेबद्दल, दर्जाबद्दल बोलत असतानाही जे. पी. नाईक यांच्या दूरदृष्टीचा उल्लेख करून, त्यांनी सांगितलेल्या मळवाटेवरून आपण पुढे जाऊ शकू, असे वाटते.

शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत एक महत्वाची बाब जे. पी. नाईक यांनी सांगितली आहे. त्यांनी म्हटले आहे की, ".....उत्कृष्ट शिक्षणासाठी मोठया गुंतवणुकीची व समृध्द भौतिक सामग्रीची गरज आहे यात शंकाच नाही. पण

त्याहून अधिक मानवी प्रयत्नांची गरज आहे. शिक्षणखात्याचे अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी व पालक या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच दर्जेदार शिक्षण निर्माण होणार आहे. आज या घटकांत अशी प्रवृत्ती दिसते की, काम शक्यतेवढे कमी करायचे त्याचा दर्जाही पाहायचा नाही, पण अधिक आर्थिक गुंतवणुकीची व भौतिक साधनसोयींची - चांगल्या शिक्षणासाठी त्यांची अपरिहार्य गरज आहे या नावाखाली - सतत मागणी करावयाची." किंबहुना यामुळेच " आत्तापर्यंत शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी जे प्रयत्न झाले, त्यात मानवी सामर्थ्याचा उपयोग करून घेण्याऐवजी भौतिक सुखसोयी पुरविण्यावरच अधिक भर देण्यात आला." हेही निष्कषात्मक विधान जे. पी. नाईक यांनी करून ठेवली आहे.

जे. पी. नाईक यांची शिक्षणातील दूरदृष्टी मला प्रकर्षाने जाणवते ती आणखी एका वेगळ्या मुद्याच्या संदर्भात. त्यांनी म्हटले आहे की, " संख्यात्मक विस्तार साधणे हीच आत्तापर्यंतची दृष्टी होती व गुणात्मक विकास गौण मानला जात होता. पुढे लवकरच अशी व्यवस्था येणार आहे की, मुलांना शाळेत खेचून घेण्याचे व त्यांच्यात गोडी निर्माण करण्याचे आणि त्यांना शाळेत राहावे असे, वाटावयास लावण्याचे शाळांचे सामर्थ्य वाढल्याखेरीज विस्ताराचे काम फारसे उरणार नाही. ( केवळ लोकसंख्येत वाढ होत राहिल्याने जे काम पडेल ते वेगळे ) याचा अर्थ, शाळांत भरती होण्याचे एक साधन म्हणून गुणात्मक विकासाची आवश्यकता निर्माण होणार आहे." येथे जे. पी. नाईक यांनी शिक्षणाच्या मूलभूत प्रश्नावर नेमके बोट ठेवले आहे.

जे. पी. नाईक यांच्या या विश्लेषणाला आणखी सुमारे पंचेचाळीस वर्षे झाल्यानंतरही आजची प्राथमिक शिक्षणाची परिस्थिती पूर्वी होती तशाच प्रकारची राहिली आहे. आजही राज्याराज्यांमधून प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्क अंमलात आलेला नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे तर शाळेत जाणा-या मुलांबरोबरच शाळेत न जाणा-या आणि शाळांतून गळती होणा-या मुलांची संख्या फुगतच आहे. अनेक खाजगी व सरकारी अहवाल शिक्षणाच्या सद्य परीस्थितीचे दर्शन देणारे आहेत. त्यांच्या आकडेवारीत आणि विश्लेषणांत फरक असला तरी त्यांचे निष्कर्ष सामान्यतः समानच आहेत. अजूनही आपण सर्व मुलांना शाळेत ' येती ' करू शकलो नाही. त्यांची ' गळती ' थांबवून त्यांना ' टिक ती ' करू शकलो नाही. आणि शाळेत रोजच्या रोज येऊनही अनेक मुलांना आपण ' शिकती 'करू शकलो नाही.

यासंदर्भातील कोणत्याही आकडेवारीचा वेध घेतला तरी हे चित्र स्पष्ट होईल. भारतीय शिक्षणखात्याने, जुलै ऑक्टोबर, २००५ मध्ये घेतलेल्या एका नमुना पाहणीचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. भारतात, १९.४ काटी मुले ६ ते १३ या वयोगटात असून त्यांपैकी १.३४ कोटी मुले, अजूनही शाळेबाहेर आहेत.

२. या शालाबाह्य मुलांपैकी ६८.३% मुले कधीही शाळेत गेलेली नाहीत.

३. महाराष्ट्रात शाळेत न जाणा-या मुलांचे प्रमाण ३.१७ टक्के आहे !

४. या शाळेत न जाणा-या मुलांची सामाजिक विभागणी पाहिली तर त्यातील जास्त टक्केवारी पुढील गटांची आहे. : मुस्लिम - ९.९७, अनुसूचित जमाती - ९.५४, अनुसूचित जाती - ८.१७ आणि इतर मागासवर्गीय - ६.९०

५. याच आकडेवारीबरोबर आणखी एक आकडेवारी चिंता वाटावी अशी आहे. ६ ते १३ या वयोगटात असलेल्या मुलांची संख्या १०.९६ कोटी एवढी आहे. तर मुलींची संख्या ८.४४ कोटी एवढी म्हणजे दोन कोटींनी कमी आहे. मुलींच्या मोठया प्रमाणावर होत असलेल्या गर्भहत्यांचा हा परिणाम आहे. हा प्रश्न अर्थातच मुलींचे सामाजिक व आर्थिक स्थान उंचावण्याशी संबंधित आहे.

६. १४ वर्षे वयाच्या मुलांपैकी १३.५ टक्के मुले शाळेत जात नाही, तर याच वयाची आणखी १४.४ टक्के मुले, शाळेत जात असली तरी ती सहावी किंवा त्याखालील इयत्तांमध्ये आहेत. याचा अर्थ असा की, शाळेत जाणारांपैकी निदान २५ टक्के तरी मुले अशी आहेत की जी त्यांचे प्राथमिक सातवीपर्यंतचे - शिक्षण पूर्ण न करण्याची शक्यता आहे.

७. स्टेट एज्युकेशन रिपोर्टस् मध्ये दिलेल्या आकडेवारीनुसार, ७ ते १० या वयोगटातील आणि ६ ते १४ या वयोगटातील मुलांची शाळेतील नोंदणी संख्या, २००५ ते २००६ या वर्षात घटलेली आहे.

   ६ ते १४ वयोगटातील ही संख्या ९३.५ टक्क्यावरून ९३.२ टक्क्यापर्यंत म्हणजे, अल्पप्रमाणात का होईना, पण घटलेली आहे. अधिक चिंताजनक बाब आहे ती ७ ते १० या वयोगटातील मुलांच्या शाळेतील नोंदणीबाबत. ही संख्या २००५ साली ९५.३ टक्के होती ती पुढील वर्षी म्हणजे २००६ साली ९१.१ टक्क्यापर्यंत घसरलेली आहे.

असेही आढळून आले आहे की, ब-याच ठिकाणी मुलांची नावे शाळेत नोंदली जातात ती केवळ जेवणासाठी, शिकण्यासाठी नाही. त्यामुळे ही शाळा नोंदणीची आकडेवारीही फारशी विश्वासार्ह मानता येत नाही.

मुले शाळेत नोंदली गेली आणि ती रोज शाळेत जात राहिली तर त्यांचे शिक्षण होते असे आपले प्रधान गृहित आहे. पण, आलीकडे अनेक अहवालांनी असे दाखवून दिले आहे की, शाळेत जाती झालेली मुले शिकती होतातच असे नाही. भारतातील एकून शालेय शिक्षणाच्या विश्वासार्हतेलाच तडा देणारा हा मुद्दा आहे. शाळेत काही वर्षे घालवूनही लेखन-वाचन-गणन ही प्राथमिक स्वरूपाची कौशल्ये ही आत्मसाद होत नाहीत, अशा मुलांची संख्या मोठी आहे. अगदी अलीकडेच नियोजनमंडळाने प्रसिध्द केलेल्या अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखडयात नमूद केले आहे की, शाळेत चार वर्षे घालवूनही त्यांपैकी सुमारे ५५ टक्के मुलांनी तीन अंकी संख्येला एका अंकी संख्येने भागता येत नाही. आणि त्यांचे भाषेत आकलनही समाधानकारक नाही. वार्षिक स्टेअ एज्युकेशन रिपोर्ट

(ASER) मध्ये म्हटले आहे, की इयत्ता तिसरी-चौथीतील ६६ टक्के मुलांना पहिलेचे क्रमिक पुस्तकही वाचता येत नाही. ही आहे भारतीय प्राथमिक शाळोतील गुणवत्तेची ऐशी तैशी परिस्थिती

प्राथमिक शिक्षणाच्या असमाधानकारक परिस्थितीचा तडाखा बसतो तो प्रामुख्याने, अल्पसंख्यांक, आदिवासी, दलित अशा समाजगटांना ( आणि त्यांतही मुलींना ! ) ही सामाजिकदृष्ट्या अन्यायाची गोष्ट आहे. शिक्षणातील मागासलेपणा ही जीवनातील मागासलेपणाची खात्री देणारी परिस्थिती असते. मागासलेल्यांना मागासलेपणातून बाहेर काढण्याची क्षमता गुणवत्तापूर्ण शास्त्रीय शिक्षणात असते. परंतु आजचे शालेय शिक्षण हे मागासलेल्यांना मागासले ठेवणारेच आहे, असे खेदाने म्हणावे लागते.

भारतातील शालेय शिक्षणाच्या आजच्या दयनीय परिस्थितीवर भाष्य करताना एक महत्वाचा मुद्दा दुर्लक्षून चालणार नाही. तो असा की, शाळेत जाणा-या मुलांपैकी ८४.२ टक्के मुले ही सरकारी शाळांतून जातात. उरलेली मुले ज्या खाजगी शाळांतून शिक्षण घेतात त्या शाळांची शैक्षणिक परिस्थिती तुलनेने चांगली आहे. या सर्व खाजगी शाळा प्रामुख्याने शहरांमधून वसलेले आहेत. त्यामुळे शहरवासी माध्यम, उच्च माध्यम नि उच्च वर्गातील मुलांना, त्यांच्या भोवती असलेल्या खाजगी शाळांच्या उपलब्धतेमुळे, चांगल्या शिक्षणाची संधी मिळू शकते. अशा संधीची शक्यता खेडयातील, मागासवर्गीयांना नाही, कारण तेथे सरकारी शाळांना स्पर्धा करायला लावतील अशा खाजगी शाळा नसतात. त्यांना अपरिहार्यपणे सरकारी शाळांतूनच जावे लागते. भारतीय राज्यघटनेच्या जाहीरनाम्यात दिलेले ' संधीच्या समानतेचे तत्व अशात-हेने शिक्षणाच्या क्षेत्रातच डावलले जात आहे. (आरोग्याच्या क्षेत्रात असे नाही. तेथे सरकारी दवाखान्यांबरोबरच खाजगी दवाखानेही असू शकतात !)

प्राथमिक शिक्षणातील गुणवत्तेचा प्रश्न हा प्रामुख्याने सरकारी शाळांतील म्हणजे जिल्हा परिषदेच्या आणि नगरपालिकांच्या अखत्यारीतील शाळांच्या संदर्भातील प्रश्न आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. प्रश्न गंभीर आहे. अनेक वर्षांचा जुना रोग आहे हा.

वुडसने केलेल्या शिफारसीनुसार, हिंदुस्तानातील पाच प्रांतामध्ये ' शिक्षणखाती ' निर्माण करून ती ' डायरेक्टर ऑफ पब्लिक इंस्ट्रक्शन्स ' च्या अधिकाराखाली ठेवली. शाळांचे नियंत्रण, प्रशासन, परिवेक्षन यांसाठी ' निरीक्षक ' नेमण्यात आले. दुसरे म्हणजे खाजगी शैक्षणिक उपक्रमांना उत्तेजन देण्यासाठी अनुदान पध्दती सुरू केली. या दोन्ही तरतुदिमुळे सरकार शिक्षणाबाबत सर्वाधिकारी झाले.

प्रामुख्याने ग्रामीण भारतातील, सरकारी शाळांमधील गुणवत्तेचा प्रश्न सोडविण्याचे आव्हान खूप मोठे आहे. पण दिशा स्पष्ट आहे. एक म्हणजे, या शाळांतील शिक्षण आमुलाग्र बदलून त्याचा दर्जा उंचावणे, दुसरे म्हणजे, सरकारी शाळांना पर्यायी खाजगी ( म्हणजे गावपातळीवरील समाजाने चालविलेल्या, स्वेच्छाकार्य संस्थांनी चालविलेल्या इ.) शाळांना मुलांच्या शिक्षणात गुणवत्तेच्या सार्वत्रिकिकरणासाठी उतरू देणे. मिश्र अर्थव्यवस्थेच्या धोरणास हे सुसंगत आहे. माझे वैयक्तिक मत असे आहे की एकाचवेळी या दोन्ही दिशांनी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

एकूनच शिक्षणाचा व्यवहार सरकारी हातांमध्ये असणे यावर तात्विक व व्यावहारिक विचार होणे गरजेचे आहे. याची सुरवात थोडीशी भारतीय शिक्षणाच्या इतिहासात डोकावून करता येईल.

सरकारी मालकीखाली किंवा सरकारच्या अखत्यारीत शिक्षण असणे, ही ब्रिटिशांनी भारताला दिलेली देणगी आहे. १८५३ साली, तत्कालीन ईस्ट इंडिया कंपनीच्या परवान्याचे नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव ब्रिटिश सरकार समोर होता. त्यावेळीच, हिंदुस्तानातील शिक्षणाची जबाबदारी सरकारची आहे, असे ब्रिटिश सरकारने ठरविले आणि मग भारतातील कंपनी सरकारने याविषयीचे आपले कर्तव्य कसे पार पाडावे, याविषयीची काही तत्वे ठरवून देण्यात आली. पुढच्याच वर्षी १८५४ साली वुडस् च्या खलित्यांनच्या आधारे प्रस्तुत करण्यात आलेल्या धोरणात त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

पुढे १८५८ पासून कंपनी सरकार जाऊन त्या जागी ब्रिटिश सरकारचा कारभार सुरू झाला. तरी शिक्षणाविषयक धोरण मात्र १८५४ चेच चालू राहिले. पुढे लॉर्ड रिपन यांच्या कारकिर्दित १८८२ साली नेमलेल्या हंटर आयोगानेही प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराला महत्व देताना, पूर्वीचे धोरण पुढे चालू ठेवले. या आयोगानंतर ' शिक्षणाभोवती दो-या आवळण्याचे धोरण सरकारने अंमलात आणले,' अशी टिका शंभर वर्षापूर्वी प्रा. वा. ब. पटवर्धन यांनी आपल्या, ' शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम 'या ग्रंथात केली आहे. आजही अस्तित्वात असलेले शिक्षणविषयक कायदे, धोरणे, सरकारी परिपत्रके, यांचा एकसंध विचार आपण करू लागलो. तर, हीच टिका आपल्याला आजही करता येईल.

ज्या काळात, शिक्षणात, सरकारचा अजिबात हस्तक्षेप नव्हता, त्या काळात, म्हणजे, आठराव्या शतकात आणि तत्पूर्वी शिक्षण संख्यात्मकदृष्टया ब-यापैकी विस्तारलेले होते. आणि गुणात्मकदृष्टयाही चांगले होते. शिक्षणाचा अधिकार सर्व जातींना होता, हजारो मुलांचे शिक्षण जसे गावपातळीवरील शाळांतून होत असे तसेच ते अनेकांचे घरच्याघरीही होत असे. प्राथमिक, माध्यमिक प्रमाणेच उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयेही होती, अशा प्रकारची पुराव्यानिशी माहिती धरमपाल यांनी आपल्या ' द ब्युटिफुल ट्री' या ग्रथांत दिली आहे. परंतु हा शिक्षणाचा सुंदर वृक्षा, ब्रिटिशांनी, आपल्या ताब्यात शिक्षणाचे सर्वाधिकार घेऊन समुळनष्ट केल्याची तक्रार खुद्द गांधीजींनी त्यांच्या लंडनमधील, २०, ऑक्टोंबर १९३१ या दिवशी दिलेल्या भाषणात केलेली आहे. याच भाषणात, ब्रिटिशांच्या शिक्षव्यवस्थेवर टिका करताना, गांधीजींनी म्हटले होते की, " कसलीही भाडभीड न ठेवता, आणि मला अव्हान दिले जाण्याचा धोका पत्कारूनही, मी सांगेन की, पन्नास, शंभर वर्षापूर्वीपेक्षा आज हिंदुस्तान अधिक निरक्षर आहे." आणि सरकारी शिक्षणाची महागडी पध्दत, असे याचे कारणही गांधीजी देतात. ब्रिटिश सरकारी शिक्षण अतिमहागडे झाले असल्याचे गांधीजी दाखवून देतात. "माझा हा गरिब देश असले महागडे शिक्षण सोसू शकणार नाही." असेही गांधीजींनी म्हटले आहे. सरकारी मालकीच्या शिक्षणात सरकारी यंत्रणेवरच खूप मोठा खर्च करावा लागतो, हे आपल्या अनुभवाचे आहे.

वास्तविक पाहता सरकारचे कार्य हे केवळ कायदे-धोरणे हरविण्याची आणि त्यांचे ' व्यवस्थापन ' करण्याचे आहे. आज मात्र सरकार प्रत्यक्षपणे शाळा चालवते, क्रमिक पुस्तके तयार करून छापते, विविध परिक्षा घेणे शिक्षकांचे प्रशिक्षण करणे आणि शिक्षणाचे पर्यवेक्षण नि व्यवस्थापनही करते.

सरकारचे व्यवस्थापनही बहुधा एकसूत्रि हुकुमशाही पध्दतीने चालते. त्यात प्रत्यक्ष शाळेत मुलांबरोबर काम करणा-या शिक्षकाला कोणतीच जबाबदारी घ्यावी लागत नाही, शासनाचे गुलाम असल्यागत त्यांची वागणूक असते, त्याने त्यांची स्वयंप्रेरणा आणि सर्जनशीलताच हरवते, व शिक्षण पठडीबध्द होते. त्यामुळे सरकारचे शिक्षणावरील नियंत्रण आणि शिक्षणाचा घसरता दर्जा यांमध्ये असलेला परस्परसंबंध लक्षात घेण्याची वेळ आता आली आहे, असे म्हणता येईल.

****************************************************************************************************

शिक्षणाच्या असमाधानकारक दर्जाचे आणखी एक कारण आपल्याला शिक्षणाच्या इतिहासात आढळेल. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ज्याची फार मोठी चलती होती त्या, मानसशास्त्रीय वर्तनवादी विचारप्रणालीचा पगडा आजही शालेय शिक्षणावर फार मोठया प्रमाणात आहे. गेल्या पन्नास वर्षांमध्ये, या विचारप्रणालीचे दोष जसे ठळकपणे पुढे आले आहेत तसेच, शिक्षणाला आधारभूत असलेल्या

मानसशास्त्रानेही ही विचारप्रणाली बहुतांशी त्याज्य ठरविली आहे. आज, शालेय शिक्षाणाच्या सर्वच स्तरांवर बालकेंद्री शिक्षणाचा शिक्षणतज्ज्ञ आग्रही धरताहेत. मानसशास्त्र, मज्जाशास्त्र, भाषाशास्त्र आणि अशाच संबंधित ज्ञानशाखांचे एकत्र येण्यातूनच मुलांच्या आकलनाचा शोध घेणारे आकलनशास्त्र विकसीत झाले आहे. या सर्वच शास्त्रांत आणि विशेषतः मेंदूविषयक नवे संशोधन वेगाने पुढे येत आहे. हे सारे संशोधन, निसर्गतः मुल असते कसे, ते वाढते कसे आणि ते शिकते कसे याविषयी खूप नवे ज्ञान आपल्यापुढे आणते आहे. या नवज्ञानातून बालकेंद्री शिक्षणाचे नवे सिध्दांत आणि त्यावर आधारित असा नवा शिक्षणव्यवहार (याचा सर्वसाधारण समाज आणि शासनही असा अर्थ घेतो की प्राथमिक शिक्षणातले गणन-वाचन लेखन हे अगदी लवकर म्हणजे वयाच्या तिस-या वर्षालाच सुरू करावयाचे. ही बाब बालकाच्या क्षमता विकासांना मारक ठरणारी असते !)

अनेक ग्रंथांतून आणि अनेक प्रयोगांतून पुढे येत आहे. बहुविध बुध्दिमत्तेचा विचार, मेंदू आधारित शिक्षणाचा विचार, बालकांच्या विकासायोग्य शिक्षणाचा विचार, रचनावादी शिक्षणाविचार यांवर उभारला जाणारा शिक्षणाचा व्यवहार हा मुलांच्या पदरी, शिक्षणासाठी वेचलेल्या वेळेचा नि श्रमाचा योग्य आणि पुरेपूर लाभ देणारा आहे, हेही अनेक शिक्षणाविषयक प्रयोगांनी आणि प्रयोगशील शाळांनी सिध्द करून दाखविले आहे. आपण यापैकी कशाचीच प्रत्यक्ष शालेय व्यवहारात, डि. एड.बी.एड. च्या शिक्षक प्रशिक्षणात आणि आपल्या शिक्षणविषयक धोरणात आपण दखल घेत नाही, यामुळे अनेक उपाय योजूनही शिक्षण सुधारणेच्या वाटेवर आपले एकही पाऊल पुढे पडत नाही.

प्रचलित शिक्षणाला जिचा विळखा आहे त्या वर्तनवादी विचारसरणीचे वैशिष्ट्यच असे आहे की ही प्रणाली एक बंदिस्त अशी शिक्षणव्यवस्था निर्माण करते. यात मुलांच्या ' शिकण्या ' पेक्षा, त्यांना शिक्षकांनी ' शिकविण्या ' वर भर असतो. येथे शिक्षा, बक्षिसे, स्पर्धा, परीक्षा अशा बाहय प्रेरकांवर उत्तेजनांवर भर असतो. त्यामुळे मुलांना स्वयंप्रेरणेने, स्वयंशिस्तेने, स्वयंकृतीने, स्वावलंबनाने आणि स्वयंस्फूर्तीने नि स्वयंविचाराने शिक्षण्यास वावच नसतो. जीवनात ज्यांना अनन्यसाधारण महत्व आहे अशा या सा-याच गोष्टी औपचारिक शिक्षणाबाहेर ठेवल्या जातात. यातून शिक्षण जीवनापासून दूर जाते. असे शिक्षण जीवनाची तयारी करून देत नाही आणि मग ते आपली कालप्रस्तुतता आणि कामप्रस्तुता हरवून बसते. उद्याच्या ज्ञानयुगात आजचे पठडीबध्द कमअस्सल शिक्षण घेतलेला विद्यार्थ्यांच अप्रस्तुत ठरण्याचा धोका आहे. वास्तविक शाळा चांगली गुणवत्तापूर्ण असेल, सर्व मुले योग्य रीतीने शिकती होत असतील तर आणि प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचवण्याच्या हेतूने आणखी एक पाऊल सरकारकडून टाकले जात आहे. ते म्हणजे प्राथमिक शाळांना, शालापूर्व अशा शिक्षणाच्या बालवाडया जोडण्याचे वास्तविक शासनानेच गाव-गावामधून अंगणवाडया चालविलेल्या आहेत. हाही सरकारचा शिक्षणातला अनाठायी पुढाकार आहे. सरकार आता बालशिक्षणही या निमित्ताने करू पाहत आहे. यामध्ये सरकारची भूमिका अशी आहे प्राथमिक शाळेत जाण्यापूर्वी मुले बालशाळेत वर्षे, दोन वर्षे गेली तर त्यांचे प्राथमिक शिक्षण सुधारेल परंतु बालशिक्षणाचा तो प्रधान हेतू होऊ शकत नाही. बालकाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने बालशिक्षण ही स्वतंत्रपणे महत्वाची बाब आहे. त्याचा आनुषंगिक परिणाम होऊन प्राथमिक शिक्षण जरूर सुधारेल, पण , तो बालशिक्षणाचा प्रमुख हेतू असू शकत नाही.

सहा आठ वर्षापर्यंतचे वय हे मेंदू घडणीचे अतिशय संवेदनशील असे वय असते. या काळात, विविधांगी कृतिशील अनुभव हे मेंदूचे अन्न असते. समाजात सर्वांनाच घरच्या घरी मेंदू विकासास पूकर असे, शास्त्रीय बैठक असलेले अनुभवविश्व मिळू शकणार नाही. अशावेळी समाजात अशा व्यवस्था बालशाळांच्या रूपाने मिळण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी मग अगदी वयाच्या २।। ते ३।। खेळवाडी, ३।। ते ४ ।। शिशुवाडी आणि ४।। ते ५।। वयासाठी बालवाडी अशी शास्त्रीय रचना करता येईल. ही रचना शास्त्रीय पध्दतीने का करावी, कशी करावी, तेथील शिक्षणाचे स्वरूप कसे असावे, वातावरण कसे असावे, बालवाडीतील मुलांसाठी मार्गदर्शिका कशी असावी, तिचे सैध्दांतिक व व्यवहारिक प्रशिक्षण कसे व्हावे, बालशाळेत किमान व्यवस्था कशी असावी, साधने कोणती व कशासाठी वापरावीत, साहित्याचा वापर कसा असावा आणि मुख्य म्हणजे या शिक्षणात काय काय नसावे या सगळयाचा उहापोह, १९९५ साली, महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या, ' राज्यस्तरीय बालशिक्षण समिती ' च्या (रामजोशी समिती ) अहवालात यथायोग्य केलेला आहे. हा अहवाल तत्कालीन सरकारने पूर्णतः स्वीकारला आहे. परंतु आज शासनाचे बालशिक्षणाचे सारे प्रयत्न हा स्वतःचाच अहवाल टाळून चाललेले आहे. एवढेच नव्हे तर, सरकार, अगदी प्राथमिक शिक्षणासारखे, सद्यस्थितींतील प्राथमिक शिक्षणाच्या पावलांवर पाऊल टाकून बालशिक्षण बेतू पाहत आहे. साहजिकच काही वर्षांतच त्याच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर येणार आहे.!

अंगणवाडया या बालआरोग्याचे काम चांगल्या त-हेने करतात. परंतु तेवढयाच ताकदीने बालशिक्षणाचे काम करण्याची क्षमता त्यांच्यात नाही. तसे किमान आवश्यक, आवश्यक असे शिक्षण-प्रशिक्षण, अंगणवाडी सेविकेच्या अटींत नाही. तरिही बालशिक्षण ही महत्वाची बाब आहे आणि त्याचेही सार्वत्रिकीकरण होण्याची गरज आहे. यासाठी शासनापुढे दोन पर्याय उपलब्ध आहेत.

एक, अंगणवाडया या केवळ आरोग्याची योजना म्हणून अधिक संघनतेने राबविणे आणि बालशिक्षणासाठी खाजगी स्वेच्छाकार्य व्यक्ती व संस्थांना पाचारण करणे, त्यासाठी आवश्यक ते धोरण ठरविणे, किंवा दोन, आजच्या अंगणवाडयांतील सेविकेबरोबरच बालशिक्षणाचे शास्त्रशुध्द शिक्षण घेतलेली बालसेविका नेमून, अंगणवाडयाच बालशिक्षणासाठी अधिक संघन करणे.

बालशिक्षण ही एक शिक्षणाची स्वतंत्र शाखा आहे. ती प्राथमिक शिक्षणापेक्षा अगदी वेगळी आहे, हे लक्षात ठेवून बालशिक्षणाचे शास्त्रोक्त असे रूप समाजाने स्वीकारले पाहिजे. एवढेच नव्हे तर, बालशिक्षणाचे बालकेंद्री स्वरूप प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर नेले पाहिजे. यातूनच या दोन्ही स्तरांवरील गुणवत्तेला सिध्द होण्याचे भाग्य लाभणार आहे.

❖